# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, वेंगुर्ला

बीपीएचयु वेंगुर्ला इमारत, बंदररोड कलानगर, वेंगुर्ला ४१६५१६

Email thovengurla@gmail.com, दुरध्वनी क्र.०२३६६ –२६३७४८


जाक्र.ताआअवें/एनएचएम/आस्था/दरपत्रक/[illegible]/2026 दि.30/09/26

## दरपत्रक मागणी

तालुका आरोग्य आरोग्य अधिकारी कार्यालय वेगुर्ला करिता सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षात खालिल प्रमाणे फर्निचर साहित्य खरेदी करणेचे आहे. करीता फर्निचर साहित्य पुरवठा करणेस इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| Sr No | Particulars | Total approximate Quantity | पुरवठाधारकाने सादर करावयाचे दर (Per Unit) |
|---|---|---|---|
| 1 | **Instrument Cabinet (double Door) Full MS / Powder Coated With glass door +MS Shelve/fixed** | | |
| | Size : D 18" x W 36" X H 72" | 04 Nos | |
| | 19/20 Metal Gage | | |
| 3 | **Computer Table- PLB Material** | | |
| | Size : 3 x 2 feet , | 04 Nos | |
| | With 1 drawer & 1 compartment with lock | | |
| 4 | **office Chair – Wooden** | 04 nos | |
| | 1) With Handel – Sangwan Wood | | |
| | 2) With Handel – Akashi or other Wood | | |
| 5 | **Brand– Nilkamal/ Cello/ Supreme / National – Brand wise Sperate Rate Maintain** | 10 nos | |
| | Plastic Cushion Chair with-Arm | | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रका सोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत सदरची नोंदणी प्रमाणपत्र व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

02) **नमुद दर हे सर्व प्रकारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोंच करावयाच्या वहातूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही दर/चार्जिस अदा केले जाणार नाहीत.**

03) ज्या दरपत्रक धारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार पुरवठा दिलेल्या कालावधीत करणे बंधनकारक राहिल. तसेच वस्तुच्या नग संख्येमध्ये आवश्यकतेप्रमाणे अनुदानाच्या उपलब्धते नुसार कमी अधिक बदल होवु शकतो.

04) मंजूर दरपत्रकानुसार साहित्य पोंच झालेवर सर्व करांसहित देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. संबधीत मक्तेदाराच्या बॅकखातेवर देयकाची रक्कम जमा करणेत येईल.

05) विहित मुदतीत दरपत्रके प्राप्त न झालेस अथवा पुरवठा आदेश दिलेपासून विहित मुदतीत पुरवठा न झालेस सदर पत्रक नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार यांचे रहातील. पोस्टाने पाठविलेल दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी
तालुका – वेंगुर्ला
जिल्हा – सिंधुदुर्ग

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

१) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, नोटीसबोर्ड
२) www.nrhm.maharashtra.gov.in
३) www.arogya.maharashtra.gov.in

वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.